**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार, दिनांक : २९ मे, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पुणे कल्याणीनगर कार अपघात प्रकरणी आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलणाऱ्या ससून रुग्णालयातील दोन डॉक्टरांसह शिपाई निलंबित.**
2. **शालेय शिक्षण राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा प्रसिद्ध, ३ जून पर्यंत अभिप्राय आमंत्रित.**
3. **आदिवासी गावांना सरकारी योजनांचा लाभ देण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यात क्यूआरकोड पोस्टकार्डचा अभिनव उपक्रम.**
4. **विदर्भात उष्णतेची लाट कायम, उद्या चंद्रपूर इथं उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी.**

**पुणे कल्याणी नगर अपघात**

पुणे कल्याणी नगर अपघात प्रकरणात आरोपी अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलल्या प्रकरणी ससून रुग्णालयाच्या २ डॉक्टर आणि एका शिपायाला आज निलंबित केलं गेलं आहे. निलंबित डॉ. तावरे हे ससूनच्या फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख होते तर डॉ. हळनोर हे या विभागात कार्यरत होते . आरोपी मुलाचे वडील विशाल अगरवाल यांनी २० मे रोजी डॉ. तावरे यांच्याशी संपर्क साधून त्यांना रक्ताचे नमुने बदलण्यास सांगितलं होतं. त्यानंतर आरोपी मुलाचे रक्ताचे नमुने हे कचऱ्यात फेकून देण्यात आले होते. सध्या तिघांनाही पुणे पोलिसांनी अटक केली असून त्यांना ३१ मे पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

या प्रकरणी जे. जे. रुग्णालयाच्या डीन डॉक्टर पल्लवी सापळे यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

या समितीने या प्रकरणी ४८ तासात चौकशी पूर्ण केली असून ब्लड सॅम्पल फेरफार प्रकरणी शासनाला अहवाल दिला आहे.

**अंतिम टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यात येत्याएक जून रोजी मतदान होणार असून, याटप्प्यासाठीचा प्रचार उद्या संपेल. या टप्प्यात सात राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या५७ मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघांमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे.

**शिक्षक मतदारसंघ**

आगामी विधान परिषद निवडणुकांसाठी मुंबई शिक्षक मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसनं शिवाजीराव नलावडे यांना उमेदवारी दिली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी काल ही माहिती दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या संसदीय मंडळाच्या बैठकीतल्या निर्णयानंतर नलावडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

**नाना पटोले**

राज्यातील ७५ टक्के भागात कोरडा दुष्काळ असून परिस्थिती अत्यंत भयावह आहे. काँग्रेस पक्ष जनतेला न्याय देण्यासाठी दुष्काळ पाहणी दौऱ्यावर जात असून प्रत्येक विभागाचा दौरा करून विभागीय आयुक्तांना निवेदन दिले जाईल. ३१ मे पासून या दौऱ्याला सुरुवात होत आहे, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा**

इयत्ता तिसरी ते १२ वी पर्यंतचा पाठ्यक्रम तयार करण्यासाठी शालेय शिक्षण राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा तयार करण्यात आला असून राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या http://www.maa.ac.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. या मसुद्याबाबत सर्व समाज घटक, शिक्षक, पालक, शिक्षण तज्ञ, शैक्षणिक प्रशासन यांनी ३ जूनपर्यंत आपले अभिप्राय नोंदवावेत असं आवाहन परिषदेच्यावतीनं करण्यात आलं आहे.

तिसरीपासून व्यावसायिक शिक्षणाची सोय, तिसरी ते आठवीपर्यंत पूर्व व्यावसायिक कौशल्ये आणि नववीपासून विशेष व्यावसायिक शिक्षणाची सोय उपलब्ध होणार असून त्यामध्ये कृत्रिम बुद्धीमत्ता, मशीन लर्निंग, डाटा सायन्स, कृषी आदी नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध होणार आहेत.

**विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

'खेळांमुळे खिलाडूवृत्ती व संघभावना निर्माण होते आणि हेच गुण महत्त्वाचे आहेत. त्यामुळे कोणत्याही पराभवाला सामोरे जाऊन, त्यावर मात करून नवीन भरारी घेण्याची वैयक्तिक व

सांघिक जिद्द निर्माण होते', असं प्रतिपादन महावितरणचे संचालक अरविंद भादिकर यांनी आज केलं.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४५ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती व टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेला आज प्रारंभ झाला. अरविंद भादिकर यांच्याहस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून या स्पर्धेचं उद्घाटन झालं .

या राष्ट्रीय स्पर्धेत गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, उत्तराखंड, पंजाब, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेशातील तसेच इतर खासगी अशा १४ वीज कंपन्यांचे ३० संघ आणि सुमारे ३७५ खेळाडू सहभागी झाले आहेत. शुक्रवारी दिनांक ३१ मे रोजी या स्पर्धेचा समारोप होणार आहे.

**वसंतराव नाईक राज्यकृषी विस्तार**

नागपूरच्या वसंतराव नाईक राज्यकृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था वनामती नागपूर द्वारे आज किंमत जोखीम निवारण आणि वस्तू बाजार विषयक एक दिवसीय प्रशिक्षणाचं आयोजन करण्यात आलं होतं .याअंतर्गत कृषीमाल विपणन क्षेत्रातील तज्ञ श्रीकांत कुवळेकर यांनी कृषी बाजार, किंमत निवारण, वस्तू बाजाराची ओळख आणि व्यवस्थापन तसच कृषी माल आणि आंतरराष्ट्रीय व्यापार अशा विविध विषयांवर या प्रशिक्षणात सहभागी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलं. या प्रशिक्षणाचं उद्घाटन प्रादेशिक कृषीविस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था रामेतीच्या प्राचार्य डॉ. विद्या मानकर यांच्या हस्ते झालं. सुमारे 50 शेतकरी उत्पादक संस्था या प्रशिक्षणात सहभागी झाल्या होत्या.

**अभिनव उपक्रम**

सरकारीयोजनांचा लाभ सर्व नागरिकांना मिळावा, या उद्देशानं यवतमाळ जिल्ह्यातल्या आदिवासी गावांसाठी अभिनव उपक्रम राबवला जात आहे. पांढरकवडा इथल्या आदिवासी विकास प्रकल्पातर्फे सरकारी योजनांची माहिती आणि त्याच्या लाभापासून वंचित असलेल्या ४०० आदिवासी गावांतल्या सरपंचांना क्यूआर कोर्ड असलेलं पोस्टकार्ड पाठवलं आहे. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर प्रकल्प कार्यालयाचं संकेत स्थळ उघडलं जाऊन आदिवासी विकास विभागाच्या योजनांची सविस्तर माहिती मिळणार आहे. या योजनांची माहिती गरजू लोकांपर्यंत द्यावी आणि त्यांना या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करावं असं आवाहन प्रकल्प अधिकारी सुहास गाडे यांनी केलं आहे.

**'प्री-पेड' स्मार्ट वीज मीटर**

वाढत्या थकबाकीवर उपाय म्हणून 'जेवढे पैसे तेवढा टॉक टाइम' या मोबाइल हिशेबाच्या धर्तीवर ' जेवढे पैसे तेवढे युनीट वीज' वापरण्याची सोय असलेल्या 'प्री पेड' स्मार्ट वीज मीटर राज्यात सर्वत्र लवकरच मोफत लावण्यात येणार आहेत. मीटर नादुरुस्त झाल्यास ते मोफत बदलून देण्यात येणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांवर स्मार्ट मीटरचा कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार

नाही. ग्राहकांना स्मार्ट मीटरचे विविध फायदे असल्याची माहिती महावितरणने दिली आहे. वाढती थकबाकी आणि वीजगळती सोबतच वीजचोरीला चाप लावण्यासाठी डिश टीव्ही रिचार्ज आणि मोबाईल रिचार्जच्या धर्तीवर ही 'प्री-पेड' स्मार्ट वीज मीटर काम करणार आहेत. त्यासाठी राज्यातील सर्व वीजग्राहकांकडे 'प्री-पेड' स्मार्ट वीज मीटर बसविले जाणार आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशात सर्वच राज्यांतील वीजग्राहकांकडे स्मार्ट मीटर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. महाराष्ट्रामध्ये कृषिपंपांच्या वीज जोडण्या वगळता महावितरणच्या सर्व लघुदाब वर्गवारीतील 2 कोटी 41 लाख वीजग्राहकांकडे हे स्मार्ट मीटर लावण्यात येणार आहे. ग्राहकांना वीज वितरणची सेवा देणारी, 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर आधारित महावितरण ही महाराष्ट्र शासनाच्या मालकीची कंपनी आहे.

**सामंजस्य करार**

भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था, IIITN नागपूर आणि तुळशीराम गायकवाड पाटील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, नागपूर यांनी नुकताच सामंजस्य करार केला आहे.

या सामंजस्य करारामुळे दोन्ही संस्थांना संशोधन प्रकल्प, पेपर प्रकाशन, पेटंट इत्यादींमध्ये संयुक्तपणे सहकार्य करता येईल. याशिवाय अभ्यासक्रम विकास, संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम, इत्यादी स्वरूपात शैक्षणिक उपक्रमांमध्ये वाढ करता येणार आहे. एकूणच दोन्ही संस्थांच्या संशोधन आणि शैक्षणिक संस्कृतीला या कराराने चालना मिळणार आहे.

ट्रिपल आय टी एन नागपूरचे रजिस्ट्रार कैलास दाखले आणि टीजीपीसीईटीएनचे रजिस्ट्रार डॉ. अमेय खेडीकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

**हवामान**

विदर्भात उष्णतेची लाट कायम असून आज नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला होता. याशिवाय उद्या चंद्रपूर इथं देखील उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. आगामी एक आणि दोन जूनला मात्र पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा आणि पश्चिम विदर्भातील यवतमाळ या ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. दरम्यान गेल्या 24 तासात नागपुरात 44.8 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भात सर्वाधिक तापमान चंद्रपूर इथं 45. 2 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं तर भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि अमरावती हे सर्व जिल्हे 44 अंशाच्या घरात आहेत. इतर जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 40 अंशाच्या पुढे आहे. नागपूर महानगरपालिकेतर्फे उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी हीट ॲक्शन प्लॅनची अंमलबजावणी करण्यात येत

असून यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे विविध उष्मा प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित चौधरी यांनी नागरिकांना उन्हाच्या वेळी विनाकारण घराबाहेर पडू नये आणि स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी असं आवाहन केलं आहे.

#####